# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.08.2024** **वारःसोमवार**

---

1. अधिक उत्पादक आणि हवामानाशी जुळवून घेणाऱ्या विविध पिकांच्या, एकशे नऊ वाणांचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण
2. वादग्रस्त गुंतवणुकीबाबत हिंडेनबर्गनं केलेले सर्व आरोप सेबीनं फेटाळले
3. प्रत्येक तालुक्यात संविधान भवन उभारण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा आणि
4. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेची भव्य समारंभात सांगता; सहा पदकांसह भारत 71व्या स्थानावर

**पंतप्रधान**

अधिक उत्पादन देणाऱ्या आणि हवामानाशी जुळवून घेणाऱ्या विविध पिकांच्या, एकशे नऊ वाणांचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल नवी दिल्लीतल्या कृषी विज्ञान केंद्रात झालं. तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, ऊस, कापूस अशा विविध प्रकारच्या 34 पिकांसह, 27 फळपिकांची ही वाणं आहेत. पंतप्रधानांनी काल शेतकरी आणि कृषी वैज्ञानिकांशी संवादही साधला. ही नवी वाणं तयार केल्याबद्दल त्यांनी शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं. या वाणांमुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

**हिंडेनबर्ग**

सेबी म्हणजे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं हिंडेनबर्ग रिसर्चच्या आरोपांचं खंडन केलं असून, हितसंबंधांच्या संघर्षाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्यासाठी आपल्याकडे पुरेशी अंतर्गत यंत्रणा असल्याचं स्पष्ट केलं आहे. अशा अहवालांवर गुंतवणूकदारांनी शांततेनं आणि संयमानं प्रतिक्रिया द्यावी असा सल्लाही सेबीनं दिला आहे. दरम्यान, हिंडेनबर्गनं संस्थेनं केलेल्या सर्व आरोपांचं सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनी एका निवेदनाद्वारे खंडन केलं आहे. कथित आर्थिक गैरव्यवहारात अदानी समूहानं वापरलेल्या, परदेशस्थ निधीमध्ये सेबी अध्यक्ष आणि त्यांच्या पतीची भागिदारी असल्याचा आरोप हिंडेनबर्ग रिसर्चनं नुकताच आपल्या अहवालात केला आहे. दरम्यान, असे वादग्रस्त अहवाल संसद अधिवेशन काळातच कसे प्रकाशित होतात असा प्रश्न करुन, हिंडेनबर्ग अहवालावरून भाजपानं टिका केली आहे; तर कॉंग्रेसनं या प्रकरणी संयुक्त संसदीय समितीकडून चौकशीची मागणी केली आहे.

**मुख्यमंत्री-औरंगाबाद**

संविधानाचा आदर वाढावा, त्याद्वारे सामाजिक न्यायाची भावना अधिक दृढ व्हावी यासाठी, प्रत्येक तालुक्यात संविधान भवन उभारण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, काल छत्रपती संभाजीनगर इथं कृतज्ञता सोहोळ्यात केली. अजिंठा लेणी पायथ्याशी जागतिक दर्जाच्या बुद्धविहार विपश्यना केंद्राची उभारणी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी, 50 कोटी रुपये, यासह विविध विकास प्रकल्पांना निधी

दिल्याबद्दल आंबेडकरी समाज समितीतर्फे मुख्यमंत्र्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आपण जे काही करतोय ते आपलं कर्तव्य आहे अशी भावना शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>अकोला-फडणवीस</u>**

लोकसभा निवडणुकीत आपल्या जागा कमी आल्या असल्या तरी आपला जनाधार कमी झाला नाही, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अकोला इथं, भाजपा कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना केलं. महायुतीच्या जागा कमी झाल्या असल्या तरी गेल्या तीन महिन्यांत आपण महाराष्ट्रातील वातावरण बदललं आहे, आता आपल्याला विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जायचं आहे. त्यासाठी सज्ज व्हा, असं आवाहन फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केलं.

**<u>नीलम गोऱ्हे-नाशिक</u>**

ठाण्यात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर झालेला हल्ला, म्हणजे एक प्रकारची राजकीय अशांतताच असून, अशांत परिस्थिती होऊ नये, याची काळजी त्या-त्या पक्षाच्या वरिष्ठांनी घेतली पाहिजे, असं मत विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काल नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलताना व्यक्त केलं.

**<u>जरांगे</u>**

आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही आणि हटायचं नाही, असा निर्धार मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी काल पुण्यात झालेल्या सभेत व्यक्त केला. या सभेसाठी अनेक मराठा समाज बांधव उपस्थित होते.

**<u>वृक्ष महोत्सव-रत्नागिरी</u>**

रत्नागिरीच्या लांजा तालुक्यातल्या व्हेळच्या, रुक्मिणी भास्कर विद्यालयात राजापूर-लांजा तालुका नागरिक संघ, या मुंबईतल्या संस्थेने अनोखा वृक्षमहोत्सव आयोजित केला होता. या उपक्रमाविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे रत्नागिरीचे प्रतिनिधी....

**रस्ते-महामार्गांचं रुंदीकरण असो किंवा अन्य विकासकामं, पहिली कुऱ्हाड पडते ती झाडांवर. झाडं लावायला हवीत आणि वाचवायला हवीत असं म्हणणारी तोंडं खूप आहेत; पण प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे हात त्या तुलनेत थोडेच. या पार्श्वभूमीवर रत्नागिरीच्या लांजा तालुक्यातल्या व्हेळमधला 'हे माझे झाड' हा उपक्रम दिशादर्शक आहे. व्हेळ-विलवडे या भागात म्हणजे राजापूर तालुक्यातलं वाटूळ ते संगमेश्वर तालुक्यातलं दाभोळे या ठिकाणांमधल्या रस्त्याच्या दुतर्फा पाचशे विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रत्येकी एका रोपाची लागवड करण्यात आली. वड, चिंच, पिंपळ, करंज, ताम्हण, काजरा यांसारखी स्थानिक झाडं लावल्याने ती सावलीसह पशु-पक्ष्यांना निवारादेखील देतील. विद्यार्थ्यांनी झाडांचं संगोपनही करावं, यासाठी प्रत्येक झाडाभोवती त्यांच्या नावाने संरक्षक जाळी बसवण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे निसर्गाशी बंध दृढ होऊन संवर्धनासाठी प्रोत्साहन मिळावं, हा उद्देश असल्याचं अध्यक्ष सुभाष लाड म्हणाले. कोकणाचं निसर्गसौंदर्य अबाधित राखण्यासाठी ठिकठिकाणी अशा उपक्रमांची गरज आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**<u>अत्रे पुरस्कार</u>**

साहित्य सम्राट आचार्य प्र के अत्रे यांच्या 125व्या जयंती वर्षाच्या सांगतेनिमित्त, पुण्यात प्र. के. अत्रे यांच्या चित्रपटांचा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक जब्बार

पटेल यांना काल पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते 'आचार्य अत्रे' विशेष सन्मान आणि मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आलं. मुंबईची 'आत्रेय' संस्था, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळानं, संयुक्तपणे या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. हा महोत्सव उद्यापर्यंत चालणार आहे.

**<u>प्रकाशन-नाशिक</u>**

नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नरमधील प्राध्यापक पंडितराव देशमुख यांच्या 75व्या जन्मदिनाचे औचित्य साधून, शनिवारी त्यांच्या दोन ग्रंथांचं प्रकाशन करण्यात आलं. राष्ट्रकुटांच्या अखेरच्या पर्वातील, सेऊनदेशच्या यादवांचे योगदान मांडणारी बृहद् कादंबरी आणि हेमाडी उर्फ हेमाद्रीपंत असे हे दोन ग्रंथ आहेत. आमदार सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्ष हेमंत वाजे, इतिहास अभ्यासक आणि महाराष्ट्र गॅझेटिअरचे सहलेखक, प्राध्यापक डॉक्टर संजय पुरी, समीक्षक डॉक्टर संजय बोरुडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. ऐतिहासिक दस्तावेज आणि इतिहासाचे संदर्भग्रंथ म्हणून हे दोन्ही ग्रंथ उपयुक्त असल्याचं मत पुण्यातल्या डेक्कन कॉलेजचे केतन पुरी यांनी व्यक्त केलं.

**<u>ऑलिम्पिक</u>**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा भव्य सांगता सोहळा काल पार पडला. भारतातर्फे हॉकी संघाचा गोलरक्षक पी. आर. श्रीजेश आणि नेमबाज मनू भाकर या सोहोळ्यात प्रमुख ध्वजधारी होते. या स्पर्धेत भारताला एक रौप्य आणि पाच कास्य पदकं मिळाली असून पदक तालिकेत भारत 71व्या स्थानावर राहिला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेकपटू नीरज चोप्रा यानं रौप्य पदक पटकावलं; तर नेमबाजीत मनू भाकर, स्वप्निल कुसाळे, सांघिक नेमबाजी प्रकारात सरबज्योत सिंग आणि मनु भाकर, कुस्तीमध्ये अमन सेहरावत यांनी कास्य पदकावर आपलं नाव कोरलं, भारतीय हॉकी संघानंही कास्य पदक पटकावलं. भारतासाठी पहिलं वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारे नेमबाज अभिनव बिंद्रा यांना काल ऑलम्पिक ऑर्डर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. विदर्भात वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.